# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००१५०३**

**अपिलार्थी श्री. रोशन खुशाल बडोले**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सरव्यवस्थापक (अन्नधान्य)**
दि. महाराष्ट्र स्टेट को. ऑ. मार्केटिंग फेडरेशन लि.,
कनमुर हाऊस, मुंबई

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मा. व्यवस्थापकीय संचालक**
दि. महाराष्ट्र स्टेट को. ऑ. मार्केटिंग फेडरेशन लि.,
कनमुर हाऊस, मुंबई

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ११.०९.२०२५**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १०.१०.२०२३ | - | २०.११.२०२३ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०५.०१.२०२४ रोजीच्या अर्जांन्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुख्यालय येथे दाखल केले आहे. महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुख्यालय यांनी दि. १६.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ येथे हस्तांतरित केले आहे.

अपिलार्थी यांनी दि. १०.१०.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार त्यांनी दि. २१.०७.२०२३ व दि.२५.०९.२०२३ रोजी जिल्हा पणन अधिकारी, भंडारा यांना दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने दिलेल्या अहवालाची माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही उत्तर न दिल्याने अपिलार्थींनी दि. २०.११.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, त्यांनी अपिलार्थींच्या माहिती अर्जात नमूद त्यांच्या कार्यालयाचे दि.२१.०७.२०२३ रोजीचे पत्र आयोगास सादर केले. अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, त्यांना सदर पत्राची प्रत नव्हे तर सदर पत्रांवर जिल्हा पणन अधिकारी, भंडारा यांच्याकडून प्राप्त पत्राची प्रत हवी आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, सदर विषयी माहिती अजून प्राप्त करुन घेण्यासाठी आणखी वेळेची विनंती केली. जन माहिती अधिकारी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १६.१०.२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.**

**मुंबई**
**दिनांक : १२.०९.२०२५**

State Information Commission Greater Mumbai

12-9-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

## अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००१५०३
## अपिलार्थी श्री. रोशन खुशाल बडोले
## सुनावणी दिनांक : १६.१०.२०२५ (In continuation of order dt १२.०३.२०२५)

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

सदर प्रकरणी आयोगाने मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, त्यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जात नमूद त्यांच्या कार्यालयाचे दि. २१.०७.२०२३ रोजीचे पत्र आयोगास सादर केले. अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, त्यांना सदर पत्राची प्रत नव्हे तर सदर पत्रांवर जिल्हा पणन अधिकारी, भंडारा यांच्याकडून प्राप्त पत्राची प्रत हवी आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, सदर विषयी माहिती अजून प्राप्त करुन घेण्यासाठी आणखी वेळेची विनंती केली. जन माहिती अधिकारी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल असे आदेशित केले होते.

आजच्या सुनावणी वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. श्री. पवार, व्यवस्थापक तथा जन माहिती अधिकारी व श्री. चंद्रे, प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्र. जिल्हा पणन अधिकारी, भंडारा उपस्थित असून प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्र. जिल्हा पणन अधिकारी, भंडारा यांनी त्यांचे लेखी निवेदन दि.१६.१०.२०२५ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, मुद्दा क्र. १ च्या अनुषंगाने सादर केले की, गोंदिया जिल्ह्यातील १८ मिलधारकांना देय धानासंदर्भात विगतवारी सादर केलेली होती. त्यानुसार, एस.पी. राईस मिल कोहमारा, जे.एस.आर.एम. फुड तुमखेडा, पार्थ ॲग्रो व्हीजन मुंडीपार, ईश्वर राईस मिल, महागाव या चार मिलधारकांना बँक गॅरंटीनुसार दिलेल्या डी. ओ. नुसार संबंधित मिलधारकांना प्रत्यक्ष उचल केलेल्या धानाच्या समतुल्य परिमाणाचा सी.एम. आर. एकूण ४२७०.७४ क्विंटल जादा जमा केलेला असून उर्वरीत १४ मिलधारकांचे उचल केलेल्या धानाचा समतुल्य धानाच्या परिमाणाचा एकूण १७०८०.५५ क्विंटल सी.एम. आर कमी जमा केला होता. त्यानुसार दि. २१.०७.२०२३ रोजी मा. प्रधान कार्यालय मुंबई यांच्या कारवाईबाबत सुचना प्राप्त आल्या होत्या. प्राप्त सुचनानुसार १८ मिलधारकांना उर्वरीत रब्बी हंगामातील डी. ओ. देऊन सी.एम.आर. शासनाकडे जमा करून अंतिम हिशोब करण्यात आले होते. त्या अनुषंगाने कार्यालयातील उपलब्ध रेकॉर्डनुसार उपरोक्त अहवाल सादर करण्यात येत आहे.

तसेच, मुद्दा क्र. २ बाबत सादर केले की, प्रधान कार्यालय मुंबई यांनी रब्बी हंगाम २०२१-२२ व खरिप व रब्बी हंगाम २०२२-२३ व धान खरेदी संयुक्त सह्यांचे रुजवात पत्र त्वरित सादर करण्याबाबत कळविले होते. त्या अनुषंगाने कार्यालयातील उपलब्ध रेकॉर्डनुसार उपरोक्त अहवाल सादर करण्यात आले.

मा. राज्य माहिती आयोग मुंबई यांच्या निर्देशानुसार अपिलार्थी यांना दि. २३.०९.२०२५ रोजी इंडियन पोस्ट Mo no. RM४४१०५६३३IIN द्वारे सदरची माहिती व अहवाल पोस्टाद्वारे पाठविण्यात आले होते व सदरचे पोस्ट दि. २९.०९.२०२५ रोजी प्राप्त करण्यात आल्याची पावती नुसार दिसून येते. करिता मा. राज्य माहिती आयोग यांच्या अपिलार्थी श्री. रोशन बडोले यांच्या मागणीप्रमाणे माहिती अधिकार अंतर्गत या कार्यालयाकडून देण्यात आलेल्या माहितीचा तपशील व रजिस्टरद्वारे सादर केलेल्या पोहोच सह अहवाल सादर करण्यात येत आहे.

..२/-

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थींना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : २०.१०.२०२५**

State Information Commission Greater Mumbai

प्रदीप व्यास
20-10-2025
**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**